महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.०५/
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahdiscom.in

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ५७३ दिनांक १८/ ०८/ २०१८

**विषय :** सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांचेबाबतच्या गुणगौरव व इतर तरतुदी सुधारीत करणेबाबत.

**संदर्भ :** १) प्रशासकीय परिपत्रक क्र. २८३ दि. २६.०३.२०१०.
२) परिपत्रक क्र. मासंवि/रवका/न.क्र.९/२१७९२ दि. ०८.०९.२०१७
३) परिपत्रक क्र. मासंवि/रवका/न.क्र.९/२७६८८ दि. १३.११.२०१७

........

महावितरण कंपनीमधील अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवानिवृत्तीच्या वेळी, त्यांनी सेवाकालावधीत दिलेल्या योगदानाबद्दल यथोचित गुणगौरव करण्याची तरतूद अस्तित्वात आहे. त्यानुसार सदर कर्मचाऱ्यांचा सपत्नीक/ पतीसह गुणगौरव करण्यासाठी म्हणजेच शाल आणि साडीकरीता रू ३०००/- व १००/२०० ग्रॅम चांदीचे नाणे दिले जाते. पूर्वीच्या म.रा.वि. मंडळाच्या विभाजनानंतर अस्तित्वात आलेल्या तिनही कंपनींमध्ये या संदर्भातील तरतुदींमध्ये समानता असावी या उद्देशाने सध्या गुणगौरव तथा बक्षिसाबाबतच्या उपरोक्त तरतुदीमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव कंपनी प्रशासनाच्या विचाराधीन होता.

२. आता, मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक(संचलन), संचालक (प्रकल्प) आणि संचालक(वाणिज्य) यांचेशी विचार विनिमय करून गुणगौरव तथा बक्षिसाकरिता विहीत असलेल्या विद्यमान तरतुदींमध्ये सुधारणा करण्यास मंजुरी प्रदान केलेली आहे. तसेच कंपनीमधून सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांना सेवापुस्तकाची छायाप्रत व ओळखपत्र देण्याबाबतच्या कार्यपध्दतीमध्येही सुधारणा करण्यास मंजुरी दिलेली आहे.

३. या अनुषंगाने कंपनीच्या सेवेतून सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवानिवृत्तीच्या वेळी गुणगौरव / सत्कार करण्याकरीता खालील आदेश देण्यात येत आहेत.

क) प्रशासकीय परिपत्रक क्र. २८३ दि. २६.०३.२०१० मधील, गुणगौरव/ सत्कार करताना चांदीचे नाणे देण्याबाबतची तरतूद बंद करून गुणगौरव तथा बक्षिसाची रक्कम खालीलप्रमाणे अदा करण्यात यावी.

| अ.क्र. | संवर्ग /वेतनगट | बक्षिसांचे स्वरूप | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | वेतनगट १ ते ४ | शाल, साडी व श्रीफळ | रू. २५००/- (पती व पत्नी यांना प्रत्येकी) |
| | | रोख बक्षिस | रू. ५०००/- |
| २ | कार्यकारी संचालक व त्यावरील दर्जाचे अधिकारी | शाल, साडी व श्रीफळ | रू. २५००/- (पती व पत्नी यांना प्रत्येकी) |
| | | रोख बक्षिस | रू. १०,०००/- |

ख) कंपनीच्या तरतुदी अंतर्गत स्वेच्छानिवृत्ती घेणारे कर्मचारी तसेच कंपनीने वेळोवेळी जाहीर केलेल्या विविध स्वेच्छानिवृत्ती योजने अंतर्गत निवृत्त होणारे कर्मचारी यांना सदर तरतूद लागू राहील.

ग) शिस्तभंग कारवाई अंतर्गत ज्या कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्यात येतात/ सेवेतून काढून टाकण्यात येते व असे आदेश कर्मचारी सेवाविनियमाचे सुधारपत्र क्र २२ दि. ०३.१०.२०११ अनुसार अपिलीय अधिकाऱ्यांमार्फत निर्णय होउन नियत सेवा समाप्तीच्या तारखेनंतर रद्द करण्यात येतात अशा कर्मचाऱ्यांना सदर तरतुदींचा लाभ देण्यात येईल.

४. महावितरण कंपनीमधून सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांना त्यांच्या सेवापुस्तिकेची प्रत देण्याबाबतच्या सूचना यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. या अनुषंगाने नव्याने सुचीत करण्यात येते की, कंपनीतून सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांचे सेवानिवृत्तीनंतरचे लाभ निकाली काढून संबंधीत अधिकारी/ कर्मचारी यांचेकडून मागणीची वाट न पाहता सेवापुस्तिकेची छायांकीत प्रत सेवानिवृत्तीच्या तारखेनंतर एक महिन्याच्या आत देण्यात यावी.

५. तसेच कंपनीतून सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांना, सेवानिवृत्तीच्या दिवशी कंपनीचे ओळखपत्र जमा करून घेउन सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर द्यावयाचे विहित नमुन्यातील ओळखपत्र परिपत्रक क्र. मासंवि/रवका/न.क्र.९/२७६८८ दि. १३.११.२०१७ मधील तरतुदींनुसार देण्यात यावे.

६. माहे ऑगस्ट २०१८ पूर्वी सेवेतून सेवानिवृत्त / स्वेच्छानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांची गुणगौरव/ सत्कार याबाबतची प्रकरणे या सुधारित तरतुदींच्या अनुषंगाने पुर्नविलोकीत करण्यात येऊ नयेत.

७. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

( संदेश हाके )
मुख्य महाव्यवस्थापक मासं)